| MHWR030089952017 | खटला दाखल तारीख – | १०.११.२०१७ |
|---|---|---|
| | खटला नोंदणी तारीख – | १०.११.२०१७ |
| | खटला निकाल तारीख– | १८.०७.२०२६ |
| | कालावधी – ०८ वर्ष, ०८ महिने, ०८ दिवस. | |

**भाग –' अ '**

**Form No. XXXII**

**(Title Page of the Judgment)**
**(Para 44 (i) of Chapter VI of Criminal Manual)**

**न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी (न्यायालय क्र. २), वर्धा, यांचे न्यायालयात**
(पिठासिन अधिकारी श्रीमती एम. आर. चव्हाण (हिवराळे)

**नियमित फौजदारी खटला क्र. ६०१/२०१७** **अपराध क्र. ८४६/२०१७**
[MHWR030089952017] **निशाणी क्र. २७**

महाराष्ट्र शासन तर्फे }
पोलीस निरीक्षक, }
पोलीस स्टेशन, सेवाग्राम, }
ता. व जि. वर्धा. } ... **अभियोग पक्ष**

**–वि रु ध्द–**

संजय किसनाजी कापुरे, }
वय – ४० वर्षे, व्यवसाय – मजुरी }
राहणार – मिलींद नगर, नालवाडी, वर्धा, }
ता. व जि. वर्धा. } ... **आरोपी**

.......................................................................................................

सरकारी अभियोक्ता सरकार पक्षातर्फे श्रीमती डी. पी. कोठारी
आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर.बी. अंबादे

.......................................................................................................

## दोषारोप – भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३७९ व ४११ अन्वये.

### भाग –' ब '

### (Para 44 (ii) of Chapter VI of Criminal Manual)

| | | |
|---|---|---|
| १) | गुन्हा घडल्याचा दिनांक | १६.०९.२०१७ |
| २) | प्रथम खबर अहवाल दिनांक | २०.०९.२०१७ |
| ३) | दोषारोप पत्र दाखल झाल्याचा दिनांक | १०.११.२०१७ |
| ४) | दोषारोप निश्चिती दिनांक | २१.११.२०१७ |
| ५) | पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | १२.०१.२०१८ |
| ६) | न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | १४.०७.२०२६ |
| ७) | न्यायनिर्णयाचा दिनांक | १८.०७.२०२६ |

### आरोपीचा तपशील

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामीन दिनांक | गुन्ह्याचे कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा सुनावली | बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ प्रमाणे. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | संजय किसनाजी कापुरे | २०.०९.२०१७ | ०६.०३.२०१८ | कलम ३७९ व ४११ भा.दं.वि. | निर्दोष | निर्दोष | --- |

## भाग –' क'

## (Para 44 (iii) of Chapter VI of Criminal Manual)
## LIST OF PROSECUTION/DEFENCE/COURT WITNESSES

**अ. अभियोग पक्ष –**

| अनु.क्र. | साक्षीदारांची नांवे | निशाणी | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १) | मेहमुद्दीन वहाबुद्दीन काजी | ०४ | घटनास्थळ पंच |
| २) | ज्ञानेश्वर नारायण शेंडे | ०५ | घटनास्थळ पंच |
| ३) | गणेश अण्णाजी चवरे | ०६ | साक्षदार |
| ४) | सुभाष लहानुजी भागवत | १० | फिर्यादी |
| ५) | अविनाश गोविंदराव वैद्य | २३ | जप्ती पंच |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार जर असतील तर –**

| अनु. क्र. | नांवे | निशाणी | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

क. न्यायालयीन साक्षीदार असतील तर -

| अनु. क्र. | नांवे | निशाणी | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

निशाणी कागदपत्रांची यादी

ड. अभियोग पक्ष -

| अनु. क्र. | कागदपत्रे | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १) | फिर्याद | ११ |
| २) | प्रथम खबरी अहवाल | १२ |
| २) | जप्ती पंचनामा | २४ |

इ. बचाव पक्ष -

| अनु. क्र. | कागदपत्रे | निशाणी क्र. |
|---|---|---|
| --- | --- | --- |

ई. भौतीक वस्तु -

| अनु. क्र. | भौतिक वस्तु क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| --- | --- | --- |

## न्यायनिर्णय

(घोषित दिनांक : १८/०७/२०२६)

आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३७९ व ४११ प्रमाणे दोषारोप ठेवण्यात आले आहे.

२. **सरकार पक्षाचे प्रकरण थोडक्यात खालील प्रमाणे आहेः**

फिर्यादीचा मुलगा अमोल भागवत याने ने तीन वर्षांपूर्वी अरुण पाचपोर याचेकडून यामहा एस.झेड.आर. क्र.एम.एच.३२ व्ही.५०३० ही दुचाकी रु. ४०,०००/– मध्ये खरेदी केली होती. कधी–कधी फिर्यादी देखील ती दुचाकी चालवित होते. दि.१६/०९/२०१७ रोजी दुपारी अंदाजे ३.३० वा. चे सुमारास फिर्यादी हे सदर दुचाकीने सरकारी रुग्णालय समोरुन सेवाग्राम येथे जात होते. त्यावेळी एका अनोळखी इसमाने त्यांना ''कुठे जात आहे ?'' अशी चौकशी केली. त्यावर त्यांनी ''ते सेवाग्राम जात आहे'' असे सांगितले. त्यावर अनोळखी इसमाने, ''मला देखील सेवाग्राम रुग्णालयामध्ये काम आहे'' असे त्यांना सांगितले व ''मला घेवुन चला'', असे म्हटले. त्यावर फिर्यादीने त्या अनोळखी

इसमाला सेवाग्राम रुग्णालयासमोर नेवुन सोडले आणि परत जातांना देखील फिर्यादीला तो अनोळखी इसम सेवाग्राम रुग्णालयासमोर दिसला आणि ''मी तुमच्या सोबत येतो'' असे म्हणुन तो त्यांच्या गाडीवर मागे बसला. त्यावेळी फिर्यादीने त्यास सांगितले की, गाडी विकायची आहे. त्यावर अनोळखी इसमाने गाडी चालविण्यासाठी घेतली. त्यावेळी तो गाडी वेगाने चालवित होता. त्यामुळे फिर्यादीने त्याला गाडी थांबावयास सांगितले असता त्याने चहाच्या कॅन्टीनवर गाडी थांबविली. त्यानंतर त्याने फिर्यादीला गाडीची किल्ली देण्यास नकार दिला आणि सदरचे वाहन घेवुन पळून गेला. अशा आशयावरुन फिर्यादी यांनी पोलीस स्टेशन, सेवाग्राम येथे तक्रार नोंदविली.

**३.** फिर्यादीच्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे, सेवाग्राम येथे अप. क्र.८४६/२०१७ प्रमाणे भा.दं.वि. कलम ३७९ नुसार गुन्ह्याची नोंद झाली व गुन्हा तपासात घेण्यात आला. तपासकामी तपासी अधिकारी यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा करून साक्षीदारांचे बयान नोंदविले. आरोपीला अटक केली. तपासाअंती त्यांनी आरोपीविरूध्द वरील कलमांतर्गत दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरूध्द भा.दं.वि. कलम ३७९ व ४११ खालील दंडनिय अपराधाकरीता नि.क्र. २ प्रमाणे दोषारोप निर्धारित केला. आरोपीने त्याला गुन्हा कबुल नसल्याचे कथन केले व खटला चालविण्याची मागणी नि.क्र. ३ प्रमाणे केली. पुराव्याअंति आरोपीविरुद्ध विसंगत कथन अभिलेखावर न आल्याने, आरोपीचे कलम ३१३ (१ब) फौजदारी प्रक्रिया संहिता अंतर्गत बयान वगळण्यात आले.

**५.** दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. सरकारी अभियोक्ता श्रीमती कोठारी यांनी अभिलेखाप्रमाणे युक्तिवाद केला असून, आरोपीचे वकील श्री. अंबादे यांनी आरोपीविरुद्ध पुरावा न आल्यामुळे त्याला निर्दोष बरी करण्यात यावे अशी विनंती केलेली आहे. सदर प्रकरणाच्या तथ्य व कथनानुसार खालील मुद्दे या न्यायालयापुढे न्यायनिवाडाकरीता विचारार्थ उपस्थित झालेले असून त्यांचे निष्कर्ष कारणेमिमांसा मी खालील प्रमाणे नोंदविलेले आहे –

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, दि.१६/०९/२०१७ रोजी सायंकाळी ५.३० ते ५.४५ वाजेच्या सुमारास सेवाग्राम पोलीस ठाणे समोर, वर्धा येथे आरोपीने फिर्यादीच्या मालकीची मोटर सायकल क्र.एम.एच.३२/व्ही.५०३० ची त्यांच्या संमतीशिवाय अप्रमाणीकपणे चोरी केले, आणि त्याव्दारे आरोपीने भारतीय दंड विधानाचे कलम ३७९ अन्वये शिक्षेसपात्र गुन्हा केला ? | **नकारार्थी..** |
| २. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, उपरोक्त तारखेला, वेळी व ठिकाणी आरोपीने सदर चोरी गेलेली मोटर सायकल जी की चोरीची मालमत्ता असून, ती चोरीची मालमत्ता आहे असे माहीत असतांना किंवा तसे समजण्यास कारण असतांना देखील त्याची अप्रमाणीकपणे खरेदी केली, आणि त्याव्दारे आरोपीने भारतीय दंड विधान कलम ४११ अन्वये शिक्षेसपात्र गुन्हा केला ? | **नकारार्थी..** |
| ३. | आदेश काय ? | **आरोपीला निर्दोष मुक्त केले.** |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र.१ व २ करीता** –

६. अभियोग पक्षाने त्यांचे कथन सिद्ध करण्याकरिता फिर्यादी सा.क्र.०४ सुभाष भागवत यांची साक्ष नि.क्र.१० प्रमाणे नोंदविली आहे. फिर्यादीने त्यांच्या साक्ष कथनांमध्ये घटनेची पुनरावृत्ती केलेली आहे. त्यांनी त्यांची फिर्याद नि.क्र. ११ व प्रथम खबरी अहवाल नि.क्र. १२ सिध्द केलेले आहे. त्यांनी उलटतपासामध्ये मान्य केले की, त्यांना आरोपीबद्दल काहीच माहिती नाही. त्यांना त्याचे नाव माहिती नाही व ते त्याला ओळखत नाही. त्यांनी सदरचे वाहन दुस–या व्यक्तीकडून खरेदी केले होते त्याबाबतचे दस्त त्यांच्याकडे नाही. सदर साक्षदार हे या प्रकरणातील फिर्यादी असुन सदर चोरीच्या घटनेबाबत त्यांचे साक्ष कथन जसेच्या तसे राहिलेले आहे. सबब, त्यावर निर्भर करण्यात येते.

७. सा.क्र.१ मेहमुद्दीन काजी नि.क्र.४, सा.क्र.२ ज्ञानेश्वर शेंडे नि.क्र. ५ व सा.क्र.५ अविनाश वैद्य नि.क्र.२३ हे या प्ररकणातील घटनास्थळ पंचनामा, आरोपीचा अटक पंचनामा व जप्ती पंचनामा यावरील साक्षदार आहेत. सदर तिन्ही साक्षदार यांनी सदर पंचनाम्यातील मजकूर फेटाळलेला असुन त्यावरील त्यांची स्वाक्षरी स्वीकारलेली आहे. अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षदारांना उत्तरसुचक प्रश्नास पात्र केले. तरीही सदर साक्षदारांच्या मुखातून कुठलेही विसंगत कथन अभिलेखावर आलेले नाही. सदरहु सदर साक्षदारांचे साक्ष कथन ग्राह्य धरण्यात येत नाही.

८. सा.क्र.३ गणेश चवरे नि.क्र.६ हे या प्रकरणातील प्रत्यक्षदर्शी साक्षदार आहे.

त्यांनी देखील अभियोग पक्षाच्या कथनाला दुजोरा दिलेला नाही. अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षदाराला उत्तरसुचक प्रश्नास पात्र केले. तरीही सदर साक्षदाराच्या मुखातून कुठलेही विसंगत कथन अभिलेखावर आलेले नाही. सदरहु सदर साक्षदाराचे साक्ष कथन ग्राह्य धरण्यात येत नाही.

**९.** सदर प्रकरणामध्ये अभियोग पक्षाने आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्याकरीता भारतीय दंड विधान कलम ३७९ अन्वये चोरी गेलेल्या वाहनाचा मालकीहक्क आणि फिर्यादीच्या संमतीशिवाय सदर वाहन आरोपीने पळवुन नेले किंवा त्याने चोरीच्या गुन्ह्यातील दुचाकी खरेदी केली, हे वाजवी शंकेपलिकडे सिध्द करणे अनिवार्य आहे.

**१०.** सदर प्रकरणामध्ये अभियोग पक्षाने एकुण पाच साक्षीदार तपासले असले तरी देखील त्यापैकी केवळ फिर्यादी यांनी अभियोग पक्षाच्या कथनाला दुजोरा दिलेला आहे. सबब, या प्रकरणामध्ये फिर्यादीचे साक्ष कथन इतके बळकट आहे का की, आरोपीचा गुन्हा वाजवी शंकेपलीकडे सिध्द हाईल, हे बघणे अनिवार्य आहे. भारतीय दंड विधानाचे कलम १३४ अन्वये संख्या नव्हेतर त्यांचे सुसंगत, आव्हानरहित आणि प्रस्थापीत साक्ष कथन महत्वाचे आहे. सबब, या प्रकरणामध्ये अभियोग पक्षाचे कथन हे जरीही फिर्यादीच्या साक्ष कथनावर निर्भर असले तरीही त्यांचे सदर साक्ष कथन सुसंगत अथवा प्रस्थापीत आहे किंवा नाही, हे बघणे अनिवार्य आहे. या न्यायालयाचे सदर मत मा. सर्वोच्च न्यायालय यांनी ***नामदेव वि. महाराष्ट्र शासन (२००७ ए.आय.आर. एस.सी.डब्ल्यु. १८३५)*** या न्यायनिर्णयामध्ये बळकट केलेले आहे. त्यामध्ये असे निर्देशित करण्यात आले आहे की, *''<u>पुराव्याची संख्या</u>*

*महत्वाची नसुन त्याची गुणवत्ता आणि विश्वासाहर्ता महत्वाची आहे. जर एकमेव साक्षदाराची साक्ष पुर्णपणे विश्वासार्ह, नैसर्गीक व विश्वसनीय वाटत असले तर त्या एकट्या साक्षदाराच्या साक्षीच्या आधारेही दोषसिध्दी करता येते.''*

**११.** फिर्यादीच्या साक्ष कथनानुसार घटना दि. १६/०९/२०१७ ला दुपारी ३.०० ते ४.०० वा. चे दरम्यान घडली. त्यांना अनोळखी इसमाने सेवाग्राम रुग्णलयात नेण्याकरीता त्यांची परवानगी मागीतली व त्यांनी ती दिली. त्यांनी त्याला सेवाग्राम रुग्णालयापर्यंत सोडले आणि परत येत असतांना त्यांना तो इसम पुन्हा दिसला आणि त्यांनी पुन्हा सदर इसमाला सोबत येण्याची परवानगी दिली. हा अत्यंत दुर्मिळ योगायोग फिर्यादीच्याच बाबतीत घडला. फिर्यादीच्या उलटतपासाप्रमाणे ते आरोपीला ओळखत नाही आणि तरीही त्यांनी दोनदा सदर इसमाला त्यांच्या वाहनावर येण्याची परवानगी दिली, हे कुठल्याही सतसतविवेक बुध्दी असलेल्या व्यक्तीला पटणारी नाही.

**१२.** त्याचप्रमाणे फिर्यादी सा.क्र.०४ सुभाष भागवत नि.क्र.१० यांनी त्यांच्या सरतपासामध्ये त्यांची तोंडी तक्रार नि.क्र.११ व त्याची छापील प्रत नि.क्र.१२ सिध्द केले आहे. त्यांच्या या तक्रारीतील कथनानुसार त्यांनी आरोपीला गाडी विकायची आहे असे म्हटल्यामुळे त्याने गाडी चालविण्यास घेतली. याउलट त्यांच्या सरतपासातील कथनांन्वये ते वर्धेला परत येत असतांना सदर अनोळखी इसम त्यांच्या गाडीवर त्यांचे सोबत येत असतांना ते पाणी पिण्यासाठी थांबले आणि त्यावेळी आरोपीने सदर दुचाकी चालविण्याकरीता घेतली आणि ते मागे बसले. यावरुन त्यांची तक्रार नि.क्र. ११ व त्याची छापील प्रत नि.क्र.१२

आणि त्यांचे साक्ष कथन यामधुन आरोपी त्यांचे सोबत सेवाग्राम वरुन वर्धेला येतांना त्यांचे वाहन आरोपीने कसे चालविण्यास घेतले, याबाबत दुयम कथन अभिलेखावर आलेले आहे.

**१३.** साधारणतः कुठलीही ओळखी नसताना अनोळखी इसमाला सतसतविवेक बुध्दी असणारा व्यक्ती त्याचे वाहन चालविण्यास देणार नाही. परंतु या प्रकरणातील फिर्यादी हे ओळखत नसलेल्या इसमाला वर्धेवरुन सेवाग्रामला घेवुन जातात आणि त्याला परत घेवुन येतात आणि त्याचे बाबत चौकशी करणारा साधा एक शब्दही बोलत नाही, त्या अनोळखी इसमाला त्याचेबाबत काहीही विचारत नाही, हे कुठलेही नैसर्गिक व्यवहारात्मक दिसुन येत नाही.

**१४.** सदर प्रकरणामध्ये फिर्याद ही अनोळखी इसमाविरुध्द आहे. त्याबाबची कुठलीही ओळख परेड घेतलेली नाही किंवा त्याबाबत आक्षेपही फिर्यादीकडून नाही. सदर घटना ही दि. १६/०९/२०१७ रोजी सायंकाळी ३.०० ते ५.०० चे दरम्यान सार्वजनिक ठिकाणी (चहाची टपरी किंवा पाणी पिण्याची ठिकाण) घडलेली आहे. त्यावर एका इसमाने फिर्यादीची दुचाकी पळविल्यावरही त्यांनी कुठलाही आरडाओरडा केलेला नाही किंवा वाचविण्याकरीता लोकांना आवाज दिलेला नाही. हेच नव्हेतर, सदर घटना ही दि.१६/०९/२०१७ रोजीची असल्यावरही त्याची फिर्यादी दि. २०/०९/२०१७ रोजी म्हणजेच ४ दिवसांनी दिलेली आहे. सदरची फिर्याद नोंदविणेस झालेल्या दिरंगाईचे कुठलेही कारण फिर्याद मध्ये नमुद नाही किंवा साक्षदाराने अभिलेखावर सिध्द केलेले नाही. साधारणतः कुठल्याही व्यक्तीचा प्रत्यक्ष त्याचे वाहन पळविल्यास होणारा आरडाओरडा

जिवाची हयगय आणि त्वरीत पोलिसांना गाठण्याचा प्रयत्न या प्रकरणात दिसुन येत नाही. सबब, फिर्यादीचे साक्ष कथन आणि फिर्याद नोंदवायला झालेला विलंब हे त्यांच्या तक्रारीचे कथन संशयाच्या चौकटीत मोडते. या न्यायालयाचे सदर मत मा. सर्वोच्च न्यायालय यांनी ***थुलिया कली .वि. तामिलनाडु राज्य (१९७२)(३) एस.सी.सी. ३९३)*** या न्यायनिर्णयामध्ये बळकट केलेले आहे. त्यामध्ये असे निर्देशित करण्यात आले आहे की, ''*प्रथम माहिती अहवाल दाखल करण्यास झालेला विनाकारण व अनाकलनीय विलंब हा अभियोग पक्षाच्या कथनाबाबत व त्याच्या सातत्याबाबत शंका निर्माण करतो. अशा विलंबामुळे घटना विलंबणे, अतिश्योक्ती करणे किंवा खोटी कथा तयार करण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु विलंबाचे समाधानाकारक स्पष्टीकरण असल्यास केवळ विलंबाच्या कारणावरुन अभियोग पक्षाचा संपुर्ण खटला फेटाळुन लावता येत नाही.*''

**१५.** सदर प्रकरणामध्ये वर नमुद केलेल्या निष्कर्षाप्रमाणे अनोळखी इसमासोबत आलेला दुर्मिळ योगायोग फिर्यादीची नैसर्गीक प्रतिक्रीया, त्याबाबत सार्वजनिक ठिकाणी घडलेली घटना असतांनाही ३ ते ४ दिवसापर्यंत कुठलीही कार्यवाही न करणे किंवा त्वरीत कायदेशीर कार्यवाही न करणे आणि त्याबाबतचे कुठलेही कारण तक्रार नोंदवितांना अथवा साक्ष कथनाचे वेळी नमुद न करणे हे त्यांच्या तक्रारीतील कथनाबाबत संशय उत्पन्न करणारे आहे.

**१६.** त्याचप्रमाणे फिर्यादीची फिर्याद नि.क्र. ११ व प्रथम खबरी अहवाल नि.क्र.१२ अन्वये सदरची दुचाकी त्यांचा मुलगा अमोल भागवत याने ३ ते ४ वर्षांपूर्वी अरुण पाचपोर

कडुन खरेदी केलेले आहे. ती त्यांच्या नावावर नाही. त्यांनी उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, दुचाकी बाबतचे कुठलेही दस्त त्यांच्याकडे नाही. म्हणजेच ३ वर्षांच्या कालावधीमध्ये फिर्यादीच्या मुलाने किंवा त्यांनी स्वतः सदर वाहन स्वतःचे नावे करुन घेण्याचा प्रयत्न केल्याचे दिसुन येत नाही. सदर वाहन फिर्यादीच्या कायदेशीर ताब्यात होते याबाबत देखील कुठलाही पुरावा अभिलेखावर नाही. आरोपीने सदरचे वाहन त्यांच्या ताब्यातुन पळविल्याबाबत कुठलीही ओळख परेड किंवा तसा पुरावा अभिलेखावर नाही. त्याचप्रमाणे फिर्यादीची तशी नैसर्गिक प्रक्रीया देखील अभिलेखावर सिध्द झालेली नाही.

**१७.** सदर प्रकरणामध्ये अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षदारांच्या साक्ष कथनांवरुन प्रत्यक्ष घटना ही शंकेच्या चौकटीत मोडते. तसेच सदर प्रकरणामध्ये घटनास्थळ पंचनामा, जप्ती पंचनामा, अटक पंचनामा व आरोपीचे ताब्यातुन सदर वाहन जप्त करण्यात आले, याबाबतचा कुठलाही पुरावा अभिलेखावर सिध्द झालेला नाही. सदरचे वाहन हे आरोपीच्या ताब्यामध्ये होते किंवा ते चोरीचे होते हे कथन देखील सिध्द झालेले नाही. याउलट वर नमुद केलेल्या निष्कर्षाप्रमाणे, फिर्यादीचे स्वतःचे कथन हे संशयाच्या चौकटीत मोडते. सबब, आरोपीनेच फिर्यादीच्या कायदेशीर ताब्यातील दुचाकी त्यांचे संमतीशिवाय त्यांच्या ताब्यातुन चोरुन नेली किंवा आरोपीने चोरीचे वाहनाची अप्रामाणिकरित्या खरेदी केली, हे कथन वाजवी शंकेच्या पलिकडे अभियोग पक्षाने अभिलेखावर प्रस्थापीत केलेले नाही.

**१८.** आरोपीचा गुन्हा सिध्द होईपर्यंत तो निर्दोष असते असे फौजदारी

न्यायशास्त्राचे सिध्द तत्व आहे. त्याचप्रमाणे फौजदारी प्रकरणामध्ये अभियोग पक्षाने त्यांचे कथन वाजवी शंकेपलीकडे सिध्द करणे आवश्यक आहे आणि ते सिध्द होईपर्यंत आरोपी निर्दोष असल्याबाबतचे गृहीतक आहे. सदर प्रकरणामध्ये आरोपीविरुध्द असलेला पुरावा, फिर्यादीचे साक्ष कथन व सिध्द करण्यात आलेली फिर्यादी व त्याची छापील प्रथम खबर हे वर केलेल्या निष्कर्षान्वये वाजवी शंकेपलीकडे सिध्द होत नाही. सबब, सदर गृहीतकाचा लाभ हा आरोपीच्या वतीने प्रस्थापीत होतो आणि अभियोग पक्ष त्यांचे कथन बळकटरित्या सिध्द करण्यास अपयशी ठरल्यामुळे मुद्दा क्र.१ व २ ला नकारार्थी उत्तर देण्यात येते.

**मुद्दा क्रं. ३ करीता –**

**१९.** सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल दुचाकी वाहन मुळ मालकाला देण्यात आलेले नसेल तर अपील कालावधी नंतर मुळ मालकास मालकीबाबत कागदपत्रे तपासुन नियमाप्रमाणे परत देणे न्यायोचित ठरते. परंतु या प्रकरणामध्ये कुणीही तशी मागणी केलेली नाही. सबब, सदर दुचाकी वाहनाचा अपील कालावधीनंतर जाहीर लिलाव करुन येणारी रक्कम शासन जमा करणे योग्य राहील. सदरहू हे न्यायालय मुद्दा क्र. ३ करीता पुढील आदेश पारित करीत आहे –

## आदेश

१. आरोपी संजय किसनाजी कापुरे याची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३७९ व ४११ या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.
२. आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येते. प्रकरणात सुरक्षा राशी जमा असल्यास अपिल कालावधी संपल्यानंतर आरोपीस परत करण्यात यावी.

३. प्रस्तुत प्रकरणात जप्त मुद्देमाल मोटर सायकल याची कुणीही मागणी केलेली नसल्यामुळे, अपील कालावधीनंतर त्याचा जाहीर लिलाव करुन येणारी रक्कम शासन जमा करण्यात यावे.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ प्रमाणे रूपये १५,०००/– चे नविन वैयक्तीक बंधपत्र द्यावे आणि त्याचा जुना जामीन कदबा पुढील सहा महिन्याकरीता कायम ठेवण्यात येत आहे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

MANGALA GAJANAN HIVARALE

Digitally signed by MANGALA GAJANAN HIVARALE
Date: 2026.07.18 17:37:07 +0530

स्थळ – वर्धा.
दि. १८/०७/२०२६

(श्रीमती एम. आर. चव्हाण (हिवराळे))
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
(२रे न्यायालय), वर्धा.

Certified that PDF copy of Judgment supra is word-to-word identical to the original Judgment.

( I.K.Khan )
Stenographer Grade-II